दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## नद्यांमधील गाळातून निघणारी वाळू आणि माती मोफत वाटणार

**मुंबई :** राज्यातील नद्यांची वहन क्षमता पुनःस्थापित करण्यासाठी आणि पूरनियंत्रणासाठी नदीपात्रातून काढण्यात येणारा गाळ, माती आणि गौण खनिजांच्या विल्हेवाटीबाबत महसूल व वन विभागाने शुक्रवारी नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या नव्या नियमावलीनुसार नद्यांच्या खोलीकरणातून निघणारा गाळ व माती शेतकऱ्यांना, तर गाळमिश्रित वाळू घरकूल योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना ५ ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. नदीपात्रातून काढण्यात येणाऱ्या गाळामध्ये माती, वाळू, दगड आणि गोटे यांसारख्या विविध घटकांचा समावेश असतो.

## राज्यातील रखडलेल्या 'झेडपी' आणि पंचायत समिती निवडणुका डिसेंबरमध्ये?

मुंबई : महाराष्ट्रातील रखडलेल्या २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका डिसेंबर २०२६ मध्ये होण्याची शक्यता आहे. या निवडणुका ५० टक्के आरक्षणाची संवैधानिक मर्यादा पाळून घेण्यास राज्य सरकार तयार असल्याचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली.

## थोडक्यात वार्ता

### ई-20 पेट्रोलमुळे वाहनांचे नुकसान होऊ शकते - गडकरी

**नवी दिल्ली :** ई-20 (इथेनॉल) मिश्रित पेट्रोल वापरल्याने वाहनांचे नुकसान होऊ शकते, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात दिली आहे. (Fuel Efficiency,) गडकरी यांनी पुढे म्हटले की, ई-20 मुळे काही जुन्या बीएस-3 वाहनांमधील विशिष्ट रबरचे भाग आणि गॅस्केट बदलण्याची आवश्यकता भासू शकते. भारत स्टेज (BS-III) वाहने प्रामुख्याने 2005 ते 2016 दरम्यान तयार करण्यात आली होती. हे भाग नियमित सर्व्हिसिंग दरम्यान सहजपणे बदलता येतात. अभ्यासात असे आढळून आले आहे की, ई-20 मुळे वाहनांच्या एकूण कार्यक्षमतेवर किंवा टिकाऊपणावर कोणताही मोठा परिणाम होत नाही. या वाहनांच्या इंजिनमध्ये कोणत्याही बदलांची आवश्यकता नाही, असेही गडकरींनी स्पष्ट केले.

### मंत्रालयातील कँटीनच्या फ्रीजपेक्षा चपलांचा स्टँड स्वच्छ!

**मुंबई :** मंत्रालयातील उपाहारगृहातील फ्रीजपेक्षा चपलांचा स्टँड अधिक स्वच्छ असतो, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी अन्न व औषध प्रशासनाची (एफडीए) कानउघाडणी केली. एफडीए हे सरकारी कँटीन आणि खासगी आस्थापनांना वेगळा न्याय लावून दुजाभाव करू शकत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने निष्पक्ष कारवाई करण्याचे आणि परवाना रद्द करण्याऐवजी सुधारणा नोटीस (इम्प्रूव्हमेंट नोटीस) बजावण्याचे निर्देश दिले.नवी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये त्रुटी आढळल्याने एफडीएने त्याचा परवाना रद्द केला होता. या कारवाईविरोधात हॉटेल प्रशासनाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान एफडीएने मंत्रालयातील कँटीन ७ तास तपासल्यानंतर ते ९८ टक्के स्वच्छ असल्याचा अहवाल सादर केला होता. त्यावर आक्षेप घेत न्यायालयाने वकिलांच्या पथकाला फेरतपासणीचे आदेश दिले. अवघ्या अर्ध्या तासाच्या फेरतपासणीत कँटीनमध्ये माशा, उघड्या ड्रेनेज जाळ्या, अस्वच्छ बेसिन आणि कमालीचा घाणेरडा फ्रीज आढळल्याने एफडीएच्या अहवालातील फोलपणा न्यायालयात उघडा पडला.- कोर्टरुममध्ये कँटीनच्या दुरवस्थेचे फोटो दाखवत न्यायालयाने एफडीएच्या दुटप्पी भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही, असे सांगत न्यायालयाने स्पष्ट केले की, त्रुटी आढळल्यास सुधारण्याची संधी न देता परवाने रद्द केले, तर मुंबईतील अर्धी आस्थापने बंद पडतील.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये अमोल दूध डेअरीवर छापा, 3.12 लाखांचा भेसळयुक्त साठा जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाच्या. 'सेफ फूड सेफमहाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत शहरात अन्न व औषध प्रशासनाने मोठी धडक कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे एमआयडीसी चिकलठाणा भागातील एका डेअरी युनिटवर छापा टाकून तब्बल ३ लाख १२ हजार ३८० रुपये किमतीचा ९५० किलो वजनाचा भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थ व खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एमआयडीसी चिकलठाणा येथील सर्व्हिस इंडस्ट्री प्लॉट नंबर सी-४५ मधील 'मेसर्स अमोल दूध डेअरी' (मालक- दामोदर केदार) येथे मोठ्या प्रमाणावर अन्नपदार्थांत भेसळ केली जात होती. छापा टाकला असता, त्या ठिकाणी १० ते १२ नॉन-फूड ग्रेड सोयाबीन ऑइलचे बॅरल आढळून आले. या घातक सोयाबीन तेलाचा उपयोग 'ॲनॅलॉग पनीर' आणि शुद्ध गाईचे तूप तयार करण्यासाठी केला जात असल्याचे तपासात समोर आले. या प्रकरणी प्रशासनाने तत्काळ पावले उचलत संबंधित उत्पादन युनिटचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करून आस्थापना पूर्णपणे बंद केली आहे.





या कारवाईमध्ये एकूण ९५० किलो वजनाचा ३,१२,३८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये २९९ किलो सुट्टे तूप (किंमत ₹१,६७,४४०), १९९ किलो सुट्टी साय किंवा क्रिम (किंमत ₹५५,७२०), १७४ किलो पनीर (किंमत ₹४५,२४०) आणि २७८ किलो सुट्टे रिफाइंड सोयाबीन तेल (किंमत ₹४४,४८०) यांचा समावेश आहे.

तपासादरम्यान, 'अमोल दूध डेअरी' ही शहरातील 'लक्ष्मी डेअरी'च्या तीन वेगवेगळ्या रिटेल काऊंटरवर पनीर व गाईच्या तुपाचा पुरवठा करत असल्याचे उघड झाले. त्यानुसार प्रशासनाने लक्ष्मी डेअरीच्या टीव्ही सेंटर एरिया, कामगार चौक एरिया आणि दर्गा रोडवरील श्रीराम चौक एरिया येथील तीनही शाखांवर धडक कारवाई केली. या दुकानांमधून गाईच्या तुपाचे अन्न नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून, तेथील ४१ किलो वजनाचा (किंमत ₹२९,३००) गाईच्या तुपाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

ही धडक मोहीम सहआयुक्त श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, कीर्तिका झाडे, प्रज्ञा सुरसे, फरीद सिद्धिकी आणि योगेश चिभादे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## खतटंचाईचा सामना करणारे शेतकरी आता बोगस बियाणांमुळे अडचणीत!

### कृषी विभाग अलर्ट मोडवर, 203 नमुने अप्रमाणित

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** ऑनलाइन सिस्टममुळे खतटंचाईने त्रस्त असलेले शेतकरी आता सोयाबीन, कपाशीचे बियाणे न उगवल्याने अडचणीत आले आहेत. बियाणे उगवत नसल्याच्या तक्रारी सुरू झाल्या असून, कृषी विभाग 'अलर्ट' झाला आहे. छत्रपती संभाजीनगरसह जालना आणि बीड जिल्ह्यांतील ५ हजार २३६ कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीत विविध बियाणांचे २ हजार ८३८ नमुने (सॅम्पल) घेण्यात आले. यापैकी तब्बल २०३ बियाणांचे नमुने अप्रमाणित म्हणजेच निकृष्ट दर्जाचे असल्याचे उघडकीस आल्याची माहिती गुणनियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली.

तक्रारींचा ओघ वाढल्यानंतर कृषी विभागाने तपासणी मोहीम राबविली. यामध्ये विभागात ५ हजार ५२४ कृषी निविष्ठा विक्रेत्यांपैकी ५ हजार २३६ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. याशिवाय ३०५ उत्पादकांपैकी २५२ उत्पादकांची तपासणी करण्यात आली.

विभागातील तिन्ही जिल्ह्यांत मिळून जुलै २०२६ अखेरपर्यंत २ हजार ६०२ नमुने घेण्यात आले होते. त्यानंतर २४ ते २६ जुलैदरम्यान आणखी ६६५ नमुने घेण्यात आले. यापैकी तपासणी पूर्ण झालेल्या २ हजार ८३८ नमुन्यांमध्ये २०३ नमुने निकृष्ट दर्जाचे आढळून आले.यातील ३२ प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली असून, ८६ वाणांवर विक्री बंदीचे आदेश दिल्याचे विभागीय तंत्र अधिकारी (गुणनियंत्रण) आशिष काळुसे यांनी सांगितले.

**जिल्ह्यातही धडक कारवाई**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विविध ठिकाणी ६६५ नमुने तपासण्यात आले. त्यापैकी ४८ नमुने अप्रमाणित आले. २७ कोर्ट केस करण्यात आल्या असून, २६ जणांना विक्रीबंदी आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील सहा परवाने रद्द करण्यात आले आहेत. याशिवाय जालना जिल्ह्यातील तपासणी करण्यात आलेल्या ९५५ नमुन्यांपैकी १३६ नमुने निकृष्ट दर्जाचे आढळले. चार प्रकरणात कोर्ट केस, तर ३२ जणांना विक्रीबंदी आदेश देण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यात तपासणी करण्यात आलेल्या १ हजार २१८ नमुन्यांपैकी १९ नमुने निकृष्ट दर्जाचे आढळले. २८ जणांना विक्रीबंदी आदेश देण्यात आले. विभागात एकूण १९ कृषी सेवा केंद्रांचा परवाना रद्द करण्यात आला असल्याचे काळुसे म्हणाले.

## जायकवाडीच्या नाथसागरात ७३ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा; ४४,५७४ क्युसेक वेगाने आवक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सततच्या दुष्काळच्या झळा सोसणाऱ्या, आभाळाकडे डोळे लावून बसणाऱ्या आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी आसुसलेल्या संपूर्ण मराठवाड्यासाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मनाला सुखावणारी बातमी समोर आली आहे. कधीकाळी कोरडीठाक पडणारी जमीन आणि पाण्यासाठी होणारा वणवा अनुभवणाऱ्या मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या पैठण येथील जायकवाडीच्या (नाथसागर) धरणात पाण्याचा साठा वेगाने वाढू लागला आहे. धरण परिसरात कोसळणाऱ्या पावसामुळे आणि मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या जलआवेकेमुळे बळीराजासह समस्त मराठवाड्याच्या जिवात जीव आला आहे.

३१ जुलै रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, जायकवाडी धरणात १,५९९.४५८ दलघमी इतका जिवंत पाणीसाठा उपलब्ध झाला असून, तो तब्बल ७३.६८ टक्के इतका आहे. सध्या या विस्तीर्ण नाथसागर जलाशयाची पाणीपातळी ४६२.३२४ मीटर म्हणजेच १५१६.८१ फुटांवर पोहोचली आहे. धरणाची एकूण पाणीसाठा क्षमता २,३३७.५६४ दलघमी इतकी असून, वाढत्या पाणीसाठ्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

मागील वर्षी याच दिवशी धरणात ९०.९८ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता, त्या तुलनेत यंदा हा साठा काहीसा कमी असला, तरी सध्या सुरू असलेली पाण्याची आवक प्रचंड दिलासा देणारी ठरत आहे. गेल्या अवघ्या २४ तासांत धरण परिसरात तब्बल ६० मिमी पावसाची नोंद झाली असून, या हंगामातील एकूण पर्जन्यमानाचा आकडा १६६ मिमीवर पोहोचला आहे. सतत पडत असलेल्या पावसामुळे गेल्या २४ तासांत धरणात तब्बल ४४,५७४ क्युसेक वेगाने पाण्याची विक्रमी आवक होत आहे.



**सोयगाव - सोयगाव सह तालुक्यात गुरुवार ते शुक्रवार दोन दिवसांपासून जोरदार पावसामुळे वेताळवाडी धरण ओव्हरफ्लो झाले आहे तर सोयगावच्या सोना नदीला पूर आला आहे.**

**( छायाचित्र - साई बोखारे,सोयगाव)**

## अंधानेर–मुंडवाडी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य; तातडीच्या दुरुस्तीची नागरिकांची मागणी

**कन्नड तालुका प्रतिनिधी :** कन्नड तालुक्यातील अंधानेर–मुंडवाडी हा महत्त्वाचा संपर्क रस्ता सध्या अत्यंत दुरवस्थेत असून वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवास धोकादायक बनला आहे.

पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्यामुळे वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या मार्गावरून दररोज शेकडो नागरिकांची ये-जा होत असल्याने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि रस्त्याचे कायमस्वरूपी मजबुतीकरण करावे, अशी मागणी केली आहे. लवकरात लवकर काम सुरू न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



**अंधानेर–मुंडवाडी रस्त्याची झालेली दुरवस्था ही अत्यंत गंभीर बाब आहे. या रस्त्यावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिक प्रवास करतात. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या समस्येची तातडीने दखल घेऊन रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा प्रश्न अधिक काळ प्रलंबित ठेवू नये, हीच सर्वांची अपेक्षा आहे.**

**- श्री.संदीप आर आळीगं**
**(सामाजिक कार्यकर्ते मुंडवाडी)**

## तालुक्यात पुन्हा अठरा तास संततधार; सोयगाव, धिंगापूर, बनोटी धरणे ओव्हरफलो; तीन पुल पाण्याखाली





हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव :** सोयगाव सह तालुक्यात गुरुवारी( दि.३०)रात्री आठ वाजेपासून सुरु झालेल्या कमी अधिक प्रभावाने संततधार पावसाने नागरिकांची रात्रीची झोप उडविली असून तालुक्यातील वेताळवाडी पाठोपाठ गुरुवारी(दि.३०) रात्री अकरा वाजता जरंडी(धिंगापूर) आणि बनोटी धरण ओव्हरफलो झाली असून गोंदेगाव धरण एकाच रात्रीत भरले आहे.दरम्यान झालेल्या पावसाने सोयगाव-बनोटी रस्त्यावर दाणादाण उडवून सोयगाव जवळील गवळण नाल्याच्या अर्धवट अवस्थेत असलेल्या पूल पाण्याखाली बुडाला दुसरा एक पूल पाण्यात बुडाला तर जरंडी गावाजवळील नवीन पुलाचा वळण रस्ता व घोसला गावातील खटकाली पुल चा वळण रस्ता पुरात वाहून गेल्याने सोयगाव-बनोटी-चाळीसगाव या रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती दरम्यान सोयगाव-बनोटी-चाळीसगाव रस्ता धोक्याचा झाला असून बनोटी,गोंदेगाव वरुन नागरिकांना पाचोरा मार्गे सोयगाव येण्याची वेळ आली आहे.सोयगाव-बनोटी रस्त्यावर दोन पूल वाहून गेले असून दोन पूल पाण्याखाली आहे त्यामुळे या रस्त्याची पावसाने वाट लावली आहे.त्यामुळे जरंडी आणि घोसला गावाजवळील पुलाचे वळण रस्ते वाहून गेले आहे. दरम्यान गुरुवारी रात्री सोयगाव मंडळात १५० मी मी जरंडी मंडळात-१५० मी मी बनोटी मंडळात ४५ मी मी सावळदबारा मंडळात ९५ मी मी पावसाची नोंद झाली असून शुक्रवारी दुपारी एक वाजेपर्यंत पाऊस सुरु च होता.

## "शाल जोडे"




## हेड पोस्ट ऑफिसमधील प्रवर डाकपाल यांच्या अरेरावी व दडपशाहीच्या निषेधार्थ काळी फित लावून आंदोलन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर हेड पोस्ट ऑफिस येथील प्रवर डाकपाल यांच्या कथित अरेरावी, दडपशाही व कर्मचारीविरोधी कार्यपद्धतीमुळे विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या मनमानी कारभाराचा तीव्र निषेध करण्यासाठी 'FNPO' व 'NFPE' संयुक्त कृती समितीच्या वतीने दिनांक २९ जुलै २०२६ रोजी काळी फित लावून शांततापूर्ण पद्धतीने जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. प्रशासनाच्या मुजोरीविरोधात कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने डाक विभागात खळबळ उडाली आहे.



या आंदोलनामध्ये छत्रपती संभाजीनगर विभाग तसेच लगतच्या जालना विभागातील पोस्टमन व इतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत प्रशासनाविरोधातील आपला रोष व्यक्त केला. पोस्ट ऑफिसमधील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित व हिताचे प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सुरू असलेली दडपशाहीची वागणूक पूर्णपणे थांबवावी आणि सर्व कर्मचाऱ्यांना न्याय्य व सन्मानपूर्वक वागणूक देण्यात यावी, अशा विविध मागण्या यावेळी ठळकपणे मांडण्यात आल्या.

संयुक्त कृती समितीने प्रशासनाला स्पष्ट शब्दांत तडाखा दिला आहे की, प्रवर डाकपाल यांच्या कार्यपद्धतीमुळे कर्मचाऱ्यांवर मोठा मानसिक ताण येत आहे. प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी आणि पीडित कर्मचाऱ्यांना त्वरित न्याय मिळवून द्यावा. जर यावर योग्य ती कारवाई झाली नाही, तर येत्या काळात याहून अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा सज्जड इशारा संयुक्त कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

सदर आंदोलन आर. पी. सारंग (महासचिव, NFPE) व निसार मुजावर (CHQ President, FNPO, Delhi) यांच्या मार्गदर्शक आदेशानुसार पार पडले. या आंदोलनाला संतोष लाड (Circle Secretary, FNPO) यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. या निदर्शने व आंदोलनात रवी भोसले (P-III सचिव), देवेंद्र परदेशी (ACS, NFPE), शेख फारुख (ACS, FNPO), सुनील शिंदे (Divisional Secretary, FNPO) आणि सय्यद ताज मोहम्मद (Divisional President, NFPE) यांनी सक्रिय सहभाग घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी




# संपादकीय

## केंद्रीय ओबीसी यादीतील 33 जातींचा प्रश्न: केंद्र सरकारने आता तातडीने निर्णय घ्यावा!

महाराष्ट्रातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टीने मागास असलेल्या तब्बल ३३ जाती आणि सलमानी समाज आज एका मोठ्या प्रशासकीय व कायदेशीर अन्यायाचा सामना करत आहेत. या सर्व जातींचा महाराष्ट्राच्या राज्यस्तरीय इतर मागासवर्गीय (OBC) यादीत समावेश आहे आणि त्यांना राज्य सरकारच्या योजना व आरक्षणाचा लाभही मिळतो. मात्र, केंद्रीय ओबीसी यादीत अद्याप समावेश न झाल्यामुळे या समाजातील लाखो तरुण आणि विद्यार्थी केंद्राच्या सवलतींपासून वंचित राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर, 'ओबीसी महाराष्ट्र कृती समिती'च्या प्रतिनिधींनी दिल्लीत धडक देऊन केंद्र सरकारकडे केंद्रीय अधिसूचना तातडीने प्रसिद्ध करण्याची जी मागणी केली आहे, ती पूर्णपणे न्याय्य आणि रास्त आहे. महाराष्ट्र शासनाने सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ८ ऑक्टोबर २०२४ आणि २ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या (NCBC) सकारात्मक शिफारशींसह हे प्रस्ताव केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडे आधीच पाठवले आहेत. प्रथम टप्प्यात बदगुजर, सूर्यवंशी गुजर, लेवे गुजर, पोवार-भोयर-पवार, कापेवार, तेलंगा, तेलंगी, पंटारेड्डी, लोध-लोधी, डांगरी यांसारख्या १५ जाती, तर दुसऱ्या टप्प्यात कुलवंत वाणी, कुणबी वाणी, कराडी, कानोडी, नेवे वाणी, सतनामी आणि पुढे भावसार, ईस्ट इंडियन, वीरशैव लिंगायत, वैश्यवाणी यांसारख्या ३३ हून अधिक जातींचे प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. राज्य आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची मंजुरी मिळालेली असताना केवळ अंतिम केंद्रीय अधिसूचनेच्या विलिंबामुळे हे प्रकरण लटकून राहणे अत्यंत खेदजनक आहे. या प्रशासकीय दिरंगाईचा सर्वात मोठा आणि थेट फटका महाराष्ट्रातील गुणवंत ओबीसी विद्यार्थ्यांना बसत आहे. केंद्रीय यादीत नाव नसल्यामुळे या ३३ जातींमधील विद्यार्थ्यांना आयआयटी (IIT), आयआयएम (IIM), एम्स (AIIMS) आणि केंद्रीय विद्यापीठांमध्ये ओबीसी कोट्यातून प्रवेश मिळत नाही. तसेच यूपीएससी (UPSC), एसएससी (SSC) किंवा केंद्र सरकारच्या विविध मंत्रालये व उपक्रमांमधील नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ घेता येत नाही. एकाच देशात राज्यस्तरावर मागास मानले गेलेले नागरिक केंद्राच्या स्तरावर मात्र आरक्षणापासून वंचित राहतात, ही मोठी विषमता आहे. कृती समितीच्या प्रतिनिधींनी दिल्लीत केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, रामदास आठवले, डॉ. भागवत कराड, डॉ. गणेश सिंह आणि विविध खासदारांची भेट घेऊन हा प्रश्न लावून धरला आहे. लोकप्रतिनिधींनी यावर सकारात्मक आश्वासने दिली असली, तरी आता केवळ आश्वासनांची नव्हे तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. सर्व तांत्रिक, कायदेशीर आणि प्रशासकीय टप्पे पूर्ण झालेले असल्याने आता फक्त केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीची आणि अधिसूचनेची औपचारिकता शिल्लक आहे. केंद्र सरकारने हा केवळ कागदी व्यवहार न समजता लाखो तरुणांच्या भविष्याचा प्रश्न म्हणून यावर तातडीने निर्णय घ्यावा आणि केंद्रीय अधिसूचना जारी करून या ३३ जातींना न्याय द्यावा.

## रानफुले







कोणीही न लावता, रानात उगवणारी ती रानफुलं! त्यांना कुंडीत, सज्जात, मानवाने बनवलेल्या बागांमधे रुची नसते. तेथे त्यांचा जीव घुसमटतो, मोकळ्या आकाशाखाली, निसर्गाच्या सानिध्यात, वसुंधरेच्या कुशीत, माळरानांवर, दगडांच्या खोबणीत, कडे-कपारीत, पठारांवर , सूर्यासोबत हसत, वाऱ्यासवे डुलत डोलत, बरड वाळवंटात पाय रोवून; तर धुवाँधार पावसात न कुजता न मोडता, रानफुलं त्यांच्या मनस्वी जगण्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतात. कोमल तर इतकी की, तोडली तर लगेच सुकून जातात. कृष्णाच्या सोबत्यांनी गुंफलेल्या ह्या रानफुलांची कायम ताजी टवटवीत राहणारी आपाद वनपुष्पमाला म्हणजेच पायापर्यंत रुळणारी माळ कृष्णाच्या गळ्यात असल्याचे उल्लेख अच्युताष्टकात आहेत(श्लोक7). वृत्तही मोठं गोड 'स्रग्धरा!' त्याचा अर्थच पुष्पमाला धारण करणारं! मराठीत श्लोकाच्या ओळीचा अर्थ देते-

रानपुष्पेच ताजी सुगंधी अती
सोबत्यांनी खुडोनीच जी गुंफिली
कृष्णकंठी रुळे पुष्पमालाच ती
गोजिरी बाळमूर्ती दिसे साजिरी ।।

रानफुलांचा कोमल ताजेपणा टिकून ठेवायला सुखाचा वर्षाव करणारा मेघश्याम श्रीहरी तरी पाहिजे नाहीतर पावसाचा शिडकावा करणारा श्याम मेघ तरी पाहिजे. त्यामुळे जून ते ऑक्टोबर संपेपर्यंत रानफुलांचा बहर!

वैय्यक्तिक प्रगती मोजताना दुसऱ्याशी तुलना येते; स्पर्धा येते; दुसऱ्याला खाली दाबून आपण वर येण्याचा आगाऊ अग्रेसरपणा अपेक्षित असतो. पण सामुदायिक कृतीत वा फुलण्यात एक शिस्त असते. समान रंग, समान आकार, समान उंची, उमलण्या, फुलण्या, मिटण्याची समान वेळ, एकोप्याने राहण्याचे एखाद्या गणवेशधारी शिस्तप्रिय दलाचे सर्व गुण ह्या रानफुलांनी आत्मसात केलेले असतात.

कुठल्याशा पावसाळी डोंगराळ भागात जांभळ्या तेरड्याचे कोवळे वाटणारे बुटके सैन्य आपल्या पारदर्शक गुलाबीसर देठांच्या अंगकाठ्या घेऊन, वादळ वाऱ्यात एखाद्या गुरखा रेजिमेंटसारखे चिवटपणे उभे असते. पावसाने तडकणाऱ्या तेरड्याच्या बिया त्यांचं साम्राज्य पुढच्या वर्षी वाढेल, विस्तारेल ह्याची खबरदारी घेत असतात. तर कुठे गुलाबी जांभळे टोकदार भाले किंवा थ्री नॉट थ्री रायफल्स घेतलेले कुर्डु हया रानफुलांचे म्हणजेच कोंबड्यांच्या रोपांचे जवान अनेक भागात गार्ड ड्युटीला सतर्कपणे उभे असतात.

सोनकीची पिवळी फुलं सगळा डोंगर, पठार, जमिन चिनी सैन्याप्रमाणे व्यापून पिवळी पिवळी बनवून टाकतात. 'काळी मुसळी'ची पिवळी फुलं का बरं? --- त्याच्या काळ्या बीया "पौरुष आणि बलवर्धक(?)" असल्याने भलत्याच तेजीत असतात ; तर हबेनेरिया ची पांढरी फुलं ग्लॅडिओला प्रमाणे एकावर एक उमलत एक फुलशिडीच तयार करतात. मखमली जांभळ्या पाकळ्यांमधे असलेल्या एका छोट्या पाकळीवर दवाचा थेब पडल्याप्रमाणे सीतेची आसवं मन वेधून घेतात.

अशोकाच्या पानाप्रमाणे (वेव्ही) नागमोडी, लाटालाटावाल्या लाल पिवळ्या पाकळ्यांची कळलावी किंवा अग्निशिखाची फुलं खरोखरच आगीच्या ज्वाळांची प्रतिकृती सादर करतात. पिवळी पुंगळीची हलक्या पिवळ्या रंगाची फुलं गुलबक्षी सारखी पण लहानखुरी असतात.

आपली नेहमीची कंबरमोडी रस्त्यात सुद्धा कुठल्याशा दगडाआड वाऱ्यावर डुलत असते. तिचं दांडीसकट फुल तोडून टिचकी मारल्यावर लांब उडताना पाहून, लहानपणी आम्ही रावणाचं डोकं उडवलं म्हणत असू. निळी चिरईत असो निळावंती असो सगळे जण माळरानाची शोभा कितीक पटींनी वाढवत असतात. खरखरीत पानाच्या आणि नाजुक नाजुक फुलाच्या घाणेरीच्या वा टणटणीच्या लालपिवळ्या झुडपांनी डोंगराचे भाग आपल्या मालकीचे केलेले असतात.

विंचवी किंवा वाघनखी किंवा नकटी ची गुलाबीसर जांभळी फुलं पाहिल्यावर का कोण जाणे त्यांचं नकटी नाव आवडून जातं. कांद्याचा रंग आणि सापाच्या कातडीचं टेक्श्चर घेऊन आलेली साप-कांद्याची फुलं पहायला मजा येते. फुलांनी केलेलं प्राण्यांचं अनुकरण मोठं गमतीशीर असतं. पाच पाकळ्यांचा झेंडू माळरानावरच मजेत असतो.

खेळातल्या भोवऱ्यासारख्या गुबगुबीत छोट्या गोलावर अबोलीप्रमाणे बाहेर डोकावणारी पांढरी द्रोणपुष्पीची फुल फुलतात. लिलीबाईंनी पावसात हजेरी लावली नाही तरच नवल! गुलाबी, पांढरी, पिवळी ---- लिलीचे रंग तरी किती! . पिवळ्या लिलीनी एकदा का आपला डेरा छोट्याशा भूभागावर टाकला की ती कित्येक एकर जमिन काबीज करते.

जांभळ्या फुलांचा गुंफलेला गबगुबीत लोंबणारा गजरा म्हणजे जांभळी दशमी. आभाळीची म्हणजेच sky flower ची गुलाबीसर किंवा पिवळी फुलं रान व्यापून टाकतात. गोलगुंडा, पिवळा धोत्रा, आकाश तुळस, शंकासूर ही बरीचशी ओळखू येणारी झुडपं! दुधाळी किंवा milky way ही कॅलेंड्युला प्रमाणे रान शुभ्र करणारी फुलं.

पिवळे पांढरे चवरचे पुष्पदांडे, वनराणी, कोंडल, लाल गोधडी----- किती किती ही फुलं! न संपणारी त्यांची ओळख! कित्येकांची नावंही माहित नाहीत. फक्त नजरेने त्यांचं सौंदर्य बघत रहायचं आणि मनात सुखावत रहायचं!

मधेच करवंदाच्या जाळ्या लागल्या तर रसरशीत करवंद तिथेच चाखत माखत खाण्याची मजा औरच! कुठून तरी येणारा रानजाईचा सुगंध मोहवून गेला नाही तरच नवल; तर मधेच फुललेला रान कढीपत्ता म्हणतो, 'चुरगाळून तर बघ माझं पान, असा सुगंध तुला बाजारात विकत मिळणार नाही.' चुरगाळलेलं पान बोटांवर कढिपत्याचा वास कित्येक तास रेगाळत ठेवतं

छोट्या छोट्या जागांवर आपला हक्क सांगणारी नाजुक जांभळी केसाळ लाजाळूची फुलं असोत वा गालिच्यासारखी खाली जमिनीलगत पसरत जाणारी निळी, पिवळी, पांढरी गोडुली फुलं असोत! छान जाळीच्या रुमालाने ताट झाकावे किंवा दरवाजात रांगोळीने गोल वा षट्कोनी झेला रेखावा तसा जमिनीलगत राहून त्यावर सुबक गोल आकारात सर्व दिशांनी सारखा पसरत राहणारा निळा जांभळा इटुकल्या पिटुकल्या विष्णुक्रांता वनस्पतीचा झेला बघत रहावा इतका सुंदर!

फुलांचं साम्राज्य पक्षी, कीटक, मधमाशा आणि फुलपाखरांवाचून पूर्ण होत नाही. फुलपाखरं म्हणजे फुलांच जणु उडतं प्रतिबिंब तर फुलं म्हणजे फुलपाखरांची स्थिर प्रतिमा. दोघांनाही त्यांची प्रतिमा प्रत्यक्षाहून उत्कट वाटावी इतके त्या दोघांचे रंग, रंगसंगती मनोरम! पिवळी, काळी, लालपिवळी, रंगिबेरंगी फुलपाखरं फुलांच्या ताटव्यांवर भिरभिरत असणं ही फुलांची श्रीमंती! फुलं आणि फुलपाखरांनी नटलेली वसुंधरा पहायला मिळणं ही आपली श्रीमंती!

जून ते ऑक्टोबर ह्या काळात एकमेकांसवे गुण्यागोविंदाने नांदणारी, जमिनीवरची, फुलांची छोटी मोठी पुष्पसाम्राज्य बघत जाणं हा नेत्रसुखद रंगोत्सव असतो. कुठला रंग कुठे चालू होईल आणि कोठे दुसरा त्यात मिसळून जाईल आणि हा निसर्ग सुंदर रंगांचा नक्षिदार गालिचा कसा विणत जाईल ही अनुभूती स्वतः एकदा तरी घ्यायला पाहिजे. स्वतःचं स्वत्व, स्वातंत्र्य जपत; इतरांनाही छान फुलू देत; एकोप्यानी नांदणारी विविध रंगी पुष्प साम्राज्ये एक विस्तीर्ण पुष्प साम्राज्य तयार करताना पाहून; विविध संस्कृती एकोप्याने जपणारे आम्ही भारतीयही तसेच नाही का? असा सुखद विचार मनात डोकावतो. शीळ घालत स्वच्छंदपणे डोंगर दऱ्यातून हिंडलं पाहिजे. मी हे वैभव डोळ्यात साठवायला निघालेच आहे; तुम्हीही येता ना!

स्वच्छंद विहरतो, आकाशातुन । मेघ धवल तो जसा
मनमुक्तपणे मी, तशी एकदा । फिरले दाही दिशा

ओठात शीळ मम, साद घालते । रानपाखरासवे
बहु गिरीकंदरा, पार करित मी । रानवाट अनुसरे

चढ चढता चढता , नेत्रांपुढती । साकारले पठार
उलगडतचि गेला, पुष्प गालिचा । त्यावरती अलवार

चैतन्यमयी तो, रानफुलांचा । भव्य गालिचा हसे
ते अबलख न्यारे, रंग फुलांचे । जणु इंद्रधनु विलसे

वाऱ्याने त्यावर उठती लहरी । सरसरसर धावती
टेकवी फुले शिर, शेजाऱ्यांच्या । खांद्याफांद्यांवरी

कधि रेलत चुंबत, झुलतचि अलगद । पुष्प ताटवा हसे
जणु इंद्राचे का, नंदनवन हे । वाटे मनी ऐसे

ते नृत्यनाट्य मी, बघत राहिले । विसरुन सारे भान
हृदि आनंदाचे, तरंग उठती । मन जाय मोहरून

हातात हात घालून वायुच्या । परिमल फिरेचि स्वैर
मम हृदयमंदिरी प्रवेशता तो । मम हृदय सैरभैर

मम हृदयकुपीतचि, आजही आहे । सुगंध ताजा तोच
ह्या मनपटलावर, चित्र रेखले । रंगही ओले तेच

मम हृदय मंजुषा, कधी अचानक । उघडुन जातो काळ
अन पुष्प गालिचा, नेत्रांपुढती । उलगडतो अलवार

**- अरुंधती प्रवीण दीक्षित**

## जयंती विशेष - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे :
# साहित्याच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडविणारे महामानव

"महापुरुषांचे स्मरण हे केवळ त्यांच्या जयंतीपुरते मर्यादित नसते; त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या आचरणात उतरला, तरच त्या स्मरणाला अर्थ प्राप्त होतो."

समाजाच्या वेदनांना शब्द देणारे, उपेक्षितांच्या अश्रूंना अभिव्यक्ती देणारे आणि कष्टकऱ्यांच्या घामाला सन्मान मिळवून देणारे साहित्यिक इतिहासात फार थोडे होऊन गेले. अशाच महामानवांपैकी एक म्हणजे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांना अभिवादन करतो; पण मनाला एक प्रश्न अस्वस्थ करतो आजच्या चकाकत्या जगात त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या घरात, आपल्या शाळेत आणि आपल्या मुलांच्या मनात किती पोहोचला आहे?

आज मुलांच्या हातात पुस्तकांपेक्षा मोबाईल अधिक दिसतो, संवादापेक्षा स्क्रीन अधिक दिसते आणि संस्कारांपेक्षा स्पर्धेची धावपळ अधिक दिसते. अशा वेळी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला थांबून विचार करायला भाग पाडते. ते शिकवते की शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नाही; तर माणूस घडविण्याची प्रक्रिया आहे. साहित्य म्हणजे केवळ शब्दांचा खेळ नाही; तर समाज बदलण्याची ताकद आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे संपूर्ण जीवन म्हणजे संघर्ष, स्वाभिमान आणि माणुसकीचा प्रेरणादायी प्रवास. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जन्मलेला हा असामान्य माणूस औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिला; परंतु जीवनाच्या विद्यापीठातून त्याने समाजाचे वास्तव शिकले. उपासमार, दारिद्र्य, जातीय अन्याय आणि श्रमिकांचे दुःख त्यांनी स्वतः अनुभवले. म्हणूनच त्यांच्या साहित्याला वास्तवाची धार आणि मानवतेची ऊब लाभली. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांमध्ये समाजातील शेवटच्या माणसाचा आवाज आहे. त्यांनी कधीही कल्पनारम्य साहित्य निर्माण केले नाही; त्यांनी जगलेले जीवनच शब्दांत उतरवले. म्हणूनच त्यांच्या लेखणीतून निर्माण झालेला प्रत्येक शब्द हा सामाजिक परिवर्तनाचा संदेश बनला.

अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याला लोकांच्या संघर्षाचे शस्त्र बनवले. त्यांनी अन्यायाचा निषेध केला, पण द्वेषाचा पुरस्कार केला नाही. त्यांनी स्वाभिमान शिकवला, परंतु अहंकार शिकवला नाही. त्यांनी समतेची मशाल पेटवली आणि माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार अधोरेखित केला. त्यांचे सुप्रसिद्ध वचन "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे" हे केवळ साहित्यिक वाक्य नाही; तर श्रमाला दिलेला सर्वोच्च मान आहे.

आजचा समाज अनेक संकटांना सामोरा जात आहे. शिक्षण असूनही संवेदनशीलता कमी होत आहे. भौतिक प्रगती होत असताना सामाजिक मूल्यांची घसरण होत आहे. जात, धर्म, भाषा आणि विचारांच्या नावावर माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा वेळी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाजाला पुन्हा माणुसकीच्या वाटेवर आणणारे दीपस्तंभ ठरते.

विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हा जिद्दीचा आणि आत्मविश्वासाचा सर्वोत्तम धडा आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ज्ञान, परिश्रम आणि ध्येय यांच्यामुळे इतिहास घडविता येतो, हे त्यांनी सिद्ध केले. म्हणून विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवन समृद्ध करण्यासाठी वाचन केले पाहिजे. महापुरुषांचे विचार समजून घेतले पाहिजेत. समाजातील दुर्बल घटकांविषयी संवेदनशीलता विकसित केली पाहिजे.

पालकांनीही आपल्या मुलांना फक्त गुणांची अपेक्षा ठेवू नये; तर संस्कारांची शिदोरी द्यावी. मुलांच्या हातात महागडा मोबाईल देण्यापूर्वी एखादे चांगले पुस्तक द्यावे. त्यांच्या मनात स्पर्धेपेक्षा सहकार्य, स्वार्थापेक्षा सेवा आणि द्वेषापेक्षा प्रेमाची बीजे पेरावीत. कारण उद्याचा समाज आजच्या घरात आणि आजच्या शाळेत घडत असतो.

शिक्षकांनीही वर्गखोलीत केवळ पाठ्यपुस्तक शिकवू नये, तर विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव जागवावी. अण्णाभाऊ साठे, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महामानवांच्या विचारांचे संस्कार विद्यार्थ्यांवर झाले, तर शिक्षण खऱ्या अर्थाने परिवर्तनाचे माध्यम बनेल.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती म्हणजे केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांचा दिवस नाही; तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे अधिक महत्त्वाचे आहे. एका गरजू विद्यार्थ्याला पुस्तक देणे, एका निरक्षर व्यक्तीला अक्षरओळख करून देणे, एका गरिबाच्या डोळ्यात आशेचा किरण निर्माण करणे हीच त्यांच्या विचारांना खरी मानवंदना ठरेल. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य वाचताना आपण केवळ शब्द वाचत नाही; आपण एका समाजाचा संघर्ष, एका आईचे अश्रू, एका कष्टकऱ्याचा घाम आणि एका वंचित माणसाच्या स्वाभिमानाचा इतिहास वाचत असतो. म्हणूनच त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला एक प्रश्न विचारावा "मी केवळ यशस्वी माणूस होण्यासाठी शिकत आहे की संवेदनशील माणूस होण्यासाठी?" आणि प्रत्येक पालकाने स्वतःला विचारावे "मी माझ्या मुलाला संपत्तीचा वारसा देत आहे की संस्कारांचा?"

ज्या दिवशी आपल्या घरात मुलांच्या हातात मोबाईलसोबत पुस्तकही असेल, ज्या दिवशी शिक्षणासोबत माणुसकीची शिकवण असेल, ज्या दिवशी समाजात समतेची भावना कृतीतून दिसेल, त्या दिवशी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यक्रांतीचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल.


त्यांच्या जयंतीनिमित्त आपण एकच संकल्प करूया मनातील जातीयतेचे बीज नष्ट करूया, संविधान वाचवू या, महापुरुषांची चरित्रे वाचू या, विचार करू या, समता जागवूया आणि माणुसकी जपूया.हीच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना सर्वात मोठी मानवंदना ठरेल.

**लेखिका**
**मीरा रामदास वाघमारे**
**संचालिका माई वृद्धाश्रम**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8421141104**

# चोरासोबत संगणमत करून रक्कम पोलिसांनीच आपसात वाटून घेतल्याचा संशय केला व्यक्त
## दिव्यांग कलाशिक्षकाचे जिन्सी पोलिसांवर गंभीर आरोप; दोन महिने उलटूनही तपासाचा पत्ता नाही

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** दिव्यांग कलाशिक्षकाच्या घरात चोरी झाल्याची घटना कैलासनगरात २ जून रोजी समोर आली होती. चोरट्याने कपाटात ठेवलेले ७ लाख रुपये रोख आणि २ लाख रुपयांच्या सोन्याच्या बांगड्या चोरून नेल्याप्रकरणी जिन्सी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. सुरुवातीला तक्रार घेण्यास टाळाटाळ आणि आता दोन महिने उलटूनही तपासाचा पत्ता नाही. गुरुवारी (३० जुलै) दिव्यांग कलाशिक्षकाने जिन्सी पोलीस ठाण्यात येऊन पोलिसांना स्मरणपत्र देत, गंभीर आरोप केल्याने खळबळ उडाली आहे. चोरासोबत संगणमत करून पोलिसांनी रक्कम आपसात वाटून घेतली आणि चोराला सोडून दिल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. जिन्सी पोलिसांविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला आहे.



कलाशिक्षक अमोल भुजंगराव देवडे (वय ४९, रा. कैलासनगर, स्मशान मारोती रोड, छत्रपती संभाजीनगर) यांनी २ जूनला तक्रार दिली होती, की त्यांच्या शेजारी त्यांचे भाऊ सदाशिव भुजंगराव देवडे राहतात. त्यांच्याच बाजूला आई-वडील असे सर्व जण किरायाने राहतात. स्वतःचे घर घेणे असल्याने त्यांनी १० वर्षांपासून पगार झाल्यानंतर बँकेतून दरमहा अंदाजे २० ते २५ हजार रुपये काढून त्यातील काही पैसे उदरनिर्वाहासाठी वापरून उर्वरित रक्कम घरातील लाकडी कपाटात ठेवली होती.

७ मे रोजी रात्री ११ च्या सुमारास पगार झाल्यानंतर नेहमीप्रमाणे पैसे काढून त्यांनी लाकडी कपाटात ठेवले. १४ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास त्यांनी कपडे घेण्यासाठी लाकडी कपाट उघडले असता पैसे व सोन्याचे दागिने दिसून आले नाहीत. अंदाजे ७ लाख रुपये रोख व २ लाख रुपयांच्या सोन्याच्या चार तोळ्यांच्या बांगड्या चोरीला गेल्याचे लक्षात आले. देवडे यांनी जिन्सी पोलीस ठाण्यात धाव घेऊन २ जूनला तक्रार दिली. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे करत होते.

एफआयआरमध्ये खोटी नोंद घेतल्याचा आरोप

देवडे यांच्या आरोपानुसार, तक्रार देण्यासाठी ते जेव्हा आले होते तेव्हा पोलिसांनी गुन्हा नोंदविण्याऐवजी लेखी तक्रार देण्यास सांगितले. तक्रार आणून दिल्यानंतर १४ मेपासून २ जूनपर्यंत ते पोलीस ठाण्याचे हेलपाटे मारत होते. देवडे हे पायाने दिव्यांग आहेत, त्यांना नीटसे चालताही येत नाही. तरीही पोलिसांनी हा प्रकार केला, हे विशेष. अखेर २ जूनला गुन्हा दाखल केला, पण त्यातही चुकीच्या नोंदी घेतल्या.

२० लाख रुपयांऐवजी केवळ ७ लाख रुपये चोरीला गेल्याचे नोंद केले आणि ४ तोळे सोन्याची किंमत केवळ २ लाख रुपये ठरवली. नंतर तपासच केला नाही. विशेष म्हणजे, देवडे यांनी चोरीचा संशय एका व्यक्तीवर व्यक्तही केला होता. पोलिसांनीच संशयितांची चौकशी करून त्याच्यासोबत संगणमत करून चोरीची रक्कम आपापसात वाटून घेतली आणि त्याला सोडून दिले. आपण दिव्यांग असल्याने काहीच करू शकत नाही, त्यामुळे आपली फसवणूक केल्याचे देवडे यांनी म्हटले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी





**जिंतूर येथील गुरु पौर्णिमा निमित्त भाजपाच्या वतीने गुरुकुलचे महेशानंद पुरी महाराजांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी भाजपा जिल्हा संघटक डॉ पंडित दराडे, तालुकाध्यक्ष गोविंद थिटे, मंडळ अध्यक्ष विलास भंडारे, सचिन रायपत्रीवार, विजय जाधव, रमेश संगेकर, सुमेर सूर्यवंशी, चंद्रकांत ताठे, बंटी जाधव आदी उपस्थित होते.**

## उरण तालुक्यातील युवा समाज सेवक विकास कडू यांची साई ट्रस्ट जेएनपीटी उरण पीटीए उपाध्यक्षपदी

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी



**उरण / रायगड :** जेएनपीटी (साई ट्रस्ट) उरण शाळा ही ३०/३५ वर्ष अतिशय नावाजल्या शाळा पैकी एक आहे. या शाळेच्या पालक प्रतिनिधी मधून दर वर्षी शाळेच्या उपाध्यक्ष पदी निवड करण्यात येते तरी या वर्षी उरण तालुक्यातील युवा समाज सेवक विकास कडू यांची निवड करण्यात आली आहे

विकास कडू यांचे थोडक्यात परिचय देयाचे असेल तर ते रायगड मधील प्रसिद्ध चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड चे संस्थापक /अध्यक्ष आहेत तसेस ते IES JNPT / RKF JNPT /UES URAN या इंग्रजी माध्यमाचे ही PTA उपाध्यक्ष राहिले आहेत.तसेच ते सारथी महाराष्ट्राचा न्युज पोर्टल व आवाज महामुंबईचा चे पत्रकार सुद्धा आहेत.ही निवड अतिशय शिस्त बद्ध वातावरणात झाली या निवडीने साई ट्रस्ट जेएनपीटीच्या सर्व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे ल. विकास कडू यांचे साई ट्रस्ट जेएनपीटी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक भूषण जाधव यांनी अभिनंदन कडून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. ही निवड साई ट्रस्ट जेएनपीटी च्या सर्व पालक प्रतिनिधी (पीटीए मेंबर )यांच्या मधून करण्यात आली आहे.विकास कडू यांची निवड होताच सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी फ़ोन, सोशल मीडिया, प्रत्यशात भेटून शुभेच्छा देऊन,अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत 20 कोटीच्या कामांना मंजुरी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी .

**परभणी :** मनपाची सर्वसाधारण सभा बुधवारी दि.29. महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांच्या अध्यक्षतेखाली बी रघुनाथ सभागृहात पार पडली. या सभेत पाणीपुरवठा. विकास निधीतून मिळालेली कामे. जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र तसेच शहरातील रस्त्याची झालेली दुरवस्था यासंबंधी सदस्यांनी मागणी लावून धरली

बैठकीत उपमहापौर गणेश देशमुख. आयुक्त नितीन नार्वेकर नगरसचिव विकास रत्नपारखी यांच्यासह नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी दिल्लीतील जंतर मंतर येथे घडलेल्या घटनेतील मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर नगरसेविका गिरीजा आजेगावकर यांनी शहरातील विहिरीच्या स्वच्छतेबद्दल महापौर उपमहापौर व आयुक्त उपायुक्त उपायुक्त तुकाराम कदम स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुर्रा.व प्रल्हाद देशमाने यांनी अभिनंदन करणारा ठराव मांडला. शहरात तब्बल नऊ दिवस पाणीपुरवठा विस्कळीत राहिल्याचा मुद्दा गटनेत्या तिरूमला खिल्लारे गिरीजा आजगावकर सपना जुकटे. रितेश जैन यांनी उपस्थित केला. पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख तन्वीर बेग.यांनी तांत्रिक अडचणी मुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले. धार रोड व आनंदनगर येथील पाईपलाईन गळती तातडीने दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली असून त्यावर त्वरित कारवाईची आश्वासन देण्यात आले. तसेच जन्म मृत्यू प्रमाणपत्रातील नावामध्ये होणाऱ्या त्रुटीमुळे नागरिकांना होत असलेल्या अडचणीचा मुद्दा ही सभेत गाजला. आयुक्तांनी प्रभाग.अ समिती.ब.व.क.अंतर्गत स्वतंत्र जन्म मृत्यू कार्यालय सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. तर महापौरांनी संबंधित कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याची घोषणा केली. आरोग्य विभागातील कार्डियाक ॲम्बुलन्स दुरुस्ती करून नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सदस्य अश्विनी जाधव यांनी केली. या विषयावर सहभाग घेत सदस्य अक्षय देशमुख यांनी कार्डियाक ॲम्बुलन्स व शववाहिनी नाममात्र दराने उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी केली. यावेळी महापौर सय्यद एकबाल यांनी प्रतीक किलोमीटर इंधन दर संबंधितांनी द्यावा असे सुचविले..




खंडोबा बाजार प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरातील रस्ता दुरुस्ती शहरातील खड्डे बुजविणे राजगोपालचारी व नेहरू उद्यान खासगी तत्त्वावर न देणे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त. शहरातील सर्व पोलवर एलईडी दिवे बसविणे आणि सण उत्सव काळात प्रकाश व्यवस्था सक्षम करण्याबाबतही विविध सदस्यांनी मागण्या मांडल्या. स्टेडियम परिसरातील प्रास्तावित राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकांच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने हटवण्याची मागणी गटनेते दिलीप ठाकूर यांनी सभागृहात केली. प्रशासनाने संबंधित विभागाला त्वरित कारवाईचे निर्देश दिल्याचे स्पष्ट केले. सभेत मागील सभांचे इतिवृत्त एकमताने मंजूर करण्यात आले....

।। रोजंदारीवरील कर्मचारी होणार नियमित।।

रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावाला मंजूर देण्यात आली. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी कल्याण अभियानांतर्गत कामांची निवड करण्यासाठी महापौर. उपमहापौर. स्थायी समिती सभापती आयुक्त व सर्व गट नेत्यांची समिती गठित करण्यासही सभागृहाने मान्यता दिली. यावेळी आयुक्त नार्वेकर यांनी नागरी स्थानिक संस्था क्षेत्रातील शाळांची विशेषत. मराठी शाळांची गुणवत्ता. वृद्धी आरोग्याच्या विशेषत. महिला आरोग्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करणे पर्यावरण व नागरी स्वच्छता पर्यटन विकास तसेच नागरी स्थांनीक संस्थांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहन देणे या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरिक लोककल्याण अभियान राबविण्यासाठी तसेच सदर अभियानांअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या नागरिक सुविधांची विभाग स्तरावर स्पर्धा आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. नागरिक क्षेत्रातील शाळा विशेषत मराठी शाळा आरोग्य विषयक नागरी स्थानिक संस्था क्षेत्रातील शाळांची विशेषत मराठी शाळांची गुणवत्ता वृद्धी आरोग्याच्या विशेषत महिला आरोग्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करणे. पर्यावरण व नागरी स्वच्छता पर्यटन विकास. तसेच नागरिक स्थानिक संस्थांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहन देणे या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान राबविण्यासाठी निर्मित करण्यात आला आहे अशी माहिती सभागृहात दिली. हा ठराव गटनेते दिलीप ठाकूर. स्थायी समितीचे सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे यांनी मांडला होता

20. कोटी रुपयांच्या.28. कामांना मंजुरी

परभणी शहरातील पीएनजी गॅस पुरवठ्यासाठी डी-कंप्रशन स्टेशन उभारणीसाठी शासकीय जमीन भाडेपट्ट्यावर देण्याचा विषयावर भगवान वाघमारे यांनी हा विषय पुढील बैठकीत देण्यात यावा यावर सभागृहाने मान्यता दिली नाही. याशिवाय महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद 2026 ते 27 योजनेअंतर्गत 20 कोटी रुपयांच्या 28 विकास कामांना मंजूर देण्यात यावी असा ठराव स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे यांनी केली. यावेळी अर्जुन सामाले यांनी प्रभाग क्रमांक 10. मध्ये कामे घ्यावी अशी मागणी केली. घरपट्टींसाठी कबालेधारक व नोटरी धारकांना रजिस्ट्रीची अट शिथील करणे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना व रमाई घरकुल योजनेतील अटी शिथील करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. तसेच जायकवाडी. रेल्वे बोर्डाकडे आवश्यक जागेच्या मागणीचाही प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नदीम इनामदार यांनी परभणी शहरातील पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत रजिस्ट्रीची अट रद्द करावी. नोटरी वर घरकुल देण्यात यावे तसेच कबाला धारकांना मालकी हक्क देण्यात यावा. जेणेकरून त्यांना घरकुल योजना मिळेल अशी मागणी नदीम इनामदार. राजेश रणखांबे. अक्षय देशमुख. मिलिंद बामणीकर. आकाश लहाने. बबलू घागरमाळे श्याम खोबे आदींनी केली...

दरम्यान या सर्वसाधारण सभेत सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला. सभेत गटनेते विजय जामकर. डॉ. केदार खटिंग. श्याम खोबे. शेरफुद्दीन सिद्दिकी. शेख रईस शेख हबीब. तब्बसूम वसीम शेख गणेश टाक. व्यंकट डहाळे. श्रीमती सुशीला थोरात. अद्वैत सांगळे. सुलोचना भालेराव आदींनी विविध विषयांवरील चर्चेत सहभाग घेतला.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.३१ जुलै :** शहरातील कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व श्री विठ्ठल रुक्मिणी यांच्या मुर्ती पुजन करून दीपप्रज्वलनाने झाली.यानंतर शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुंच्या महत्त्वावर आधारित मनोगते, कविता,भाषणे आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.गुरु म्हणजे ज्ञानाचा दीप, संस्कारांचे विद्यापीठ आणि जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून प्रभावीपणे दिला.

कार्यक्रमात ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ.राजेश यादव यांनी विद्यार्थ्यांना गुरू शिष्य यांचे महत्त्व पटवून दिले तसेच शाळेचे मुख्याध्यापक,निलेश पाटील,प्राध्यापक डॉ.दादासाहेब पवार यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या आशीर्वादाने उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संकल्प केला. गुरुपौर्णिमेचा हा कार्यक्रम प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# परभणी जिल्ह्यातील विकासकामांना गती द्या, प्रकल्प वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करा : डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी, :-** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. जिल्ह्यातील विकास प्रकल्प निर्धारित कालावधीत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावेत. प्रकल्पांचे अंदाजपत्रक तयार करताना कोणतीही बाब अपूर्ण राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव तथा परभणी जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत डॉ. पुलकुंडवार यांनी विविध विभागांच्या योजना, विकासकामे आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, महसूल विभागाची कामे, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान, पर्जन्यमान तसेच जनगणना-2027 संदर्भातील माहिती सादर केली. त्यानंतर विविध विभागप्रमुखांनी आपापल्या विभागातील योजना व विकासकामांच्या प्रगतीचे सादरीकरण केले. डॉ. पुलकुंडवार यांनी महसूल विभागाने सातबारा अद्ययावत करण्याची प्रक्रिया नियमितपणे सुरू ठेवावी, ग्रामपातळीवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहावे तसेच 'आपले सरकार' आणि पीजी पोर्टलवरील नागरिकांच्या तक्रारींचे विहित कालावधीत निराकरण करावे, असे निर्देश दिले.

जिल्ह्यात रोजगारनिर्मिती आणि उद्योगवृद्धीला चालना देण्याबरोबरच बचतगटांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच बालविवाह प्रतिबंधासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने प्रभावीपणे काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांची गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेश मंत्रीपदी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी:**-सनातन रक्षक सेना फाउंडेशन संचलित गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने पूर्ण भारतभर राज्यभर संघटनेचा प्रचार प्रसार चालू आहे कार्यकारी जाहीर करण्यात येत आहे त्यामध्ये आज आषाढी व्यासमहर्षी गुरुपौर्णिमेच्या परभणी जिल्ह्यातील मराठवाड्यातील बुलंद तोफ राष्ट्रीय गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर हे जिल्हाध्यक्ष पासून सुरुवात मराठवाडा अध्यक्ष या पदावर कार्य करणारे गोसंवर्धन गोवंश गाय नंदीबैल फिरत्या गोमातेसाठी गोशाळेच्या अनेक शासन दरबारी पाठपुरवठा सेवेच्या संघटना बांधणी अनेक कार्य उत्कृष्ट केल्याबद्दल कार्याची दखल म्हणून सनातन रक्षक सेना फाउंडेशन संचलित गौरक्षक सेना संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती अनुरमाताई सिंह यांच्या आदेशाने तसेच गौरक्षक सेना राष्ट्रीय अध्यक्ष सुनील भाई सेजाणी पटेल यांच्या पुढाकारातून गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्य प्रदेश मंत्रीपदी गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर (गाव गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी विभाग मराठवाडा राज्य महाराष्ट्र) यामधून निवड करण्यात आली गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर गौरक्षक सेना प्रदेश मंत्री पदी निवड झाल्याबद्दल विविध ठिकाणी स्वागत अभिनंदन कौतुक करण्यात येत आहे वीर वारकरी सेवा संघ महाराष्ट्र राष्ट्र जन प्राणिमित्र गोसंवर्धन अभियान फाउंडेशन परभणी कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी ग्रीन परभणी वृक्ष टीम स्वच्छता ग्रुप परभणी आषाढी वारी तीर्थयात्रा ग्रुप जनजागृती अभियान परभणी सर्व गोशाळा गोचालक गोमालक गोसेवक गोपालक गो कीर्तनकार गो कथाकार गो भागवतकार गो संत गो गायक गो वादक गोटाळकरी गो उत्पादक गो विक्रेते गो व्यापारी गो खरेदीकार गौरक्षक सेना परभणी च्या वतीने अशी माहिती गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश मंत्री गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे दिली

## आचार्य हेमसागरजी यांच्या 47व्या मंगल वर्षायोगाचा शुभारंभ 2 ऑगस्टला

### आर्यनंदी कॉलनीत भव्य मंगल कलश स्थापना सोहळा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** श्री १००८ चंद्रप्रभ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर, आर्यनंदी कॉलनी, वेदांत नगर येथे परमपूज्य सिद्धांत चक्रवर्ती आचार्य श्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७व्या मंगल वर्षायोगाचा शुभारंभ रविवार, २ ऑगस्ट रोजी भव्य मंगल कलश स्थापना सोहळ्याने होणार आहे. आर्यनंदी कॉलनी येथे प्रथमच चातुर्मास व मंगल वर्षायोगाचे आयोजन होत असल्याने सकल दिगंबर जैन समाजात उत्साहाचे वातावरण आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता भगवान जिनेंद्रदेवांच्या पंचामृत अभिषेकाने होईल. सकाळी ८.३० वाजता आचार्य श्री १०८ सन्मतिसागरजी गुरुदेव यांच्या विधानाचे आयोजन करण्यात आले असून, दुपारी २ वाजता भव्य मंगल कलश स्थापना सोहळा, आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांचे पूजन, गुरु वंदना, मंगल आशीर्वचन आणि धर्मसभा होणार आहे.

मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी सांगितले की, वर्षायोगाच्या संपूर्ण कालावधीत दररोज प्रवचन, स्वाध्याय, पूजन, विधान आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. मंगल कलश स्थापना सोहळ्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादीची व्यवस्था शैलेन्द्र सेठी, अभिषेक सेठी, राजेश सेठी आणि प्रणय सेठी परिवारातर्फे करण्यात आली आहे. सकल दिगंबर जैन समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# खुलताबाद पंचायत समितीचे गट विकास अधिकारी प्रकाश नाईक कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान आणि सेवापूर्ती सोहळा

हिंदू प्रकाश वार्ता / जिल्हा प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद तालुक्यासाठी प्रशासकीय सेवेत आपल्या प्रामाणिक आणि कर्तव्याशी एकनिष्ठ कारकिर्दीची यशस्वी वाटचाल पूर्ण करून, गटविकास अधिकारी वर्ग १ . प्रकाश वसंतराव नाईक शासनाच्या नियमाप्रमाणे दि ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त सन्मान सोहळा

प्रकाश. नाईक आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय कारकिर्दीत खुलताबाद पंचायत समितीमध्ये शासकीय कामासाठी आपल्या कामानिमित्त येणाऱ् नागरिकांना सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आणि कायम स्मरणात राहणारे आहे




पंचायत समिती स्तरावर अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या विहिरी. गाय गोठे रस्ते शेवगा लागवड. घरकुल बचत गट अपंगासाठी असलेले विविध योजना या प्रभावीपणे शासनाच्या नियमाप्रमाणे राबवून लाभार्थ्यांना शासकीय योजने चा लाभ मिळवून देण्यासाठी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत लाभार्थी मेळावा शिबिर व योजनेचे मंजूर प्रमाणपत्र वाटप करून एक आदर्श निर्माण केला यात एम आर ई जी एस कार्यक्रम अधिकारी अभिजीत गायकवाड यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी विशेष सहभाग नोंदवला

एक शिस्तप्रिय, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारा आणि तळमळीने काम करणारे अधिकारी म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. प्रशासकीय सेवेत असताना त्यांनी अनेक लोक उपयोगी विकास कामे यशस्वीपणे मार्गी लावली आणि नेहमीच सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी योग्य समन्वयाने काम केल्यास शासनाच्या योजनांचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत कसा पोहोचू शकतो, याचे उत्तम आणि अनुकरणीय उदाहरण म्हणजे प्रकाश वसंतराव नाईक खुलताबाद पंचायत समिती गट विकास अधिकारी म्हणून कारकीर्द आहे.

## आंतरराष्ट्रीय विज्ञानसंकुल प्रकल्पाची पालकसचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली पाहणी



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,:** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे अस्ट्रॉनॉमिकल सोसायटी आणि कृषि विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने साकार होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विज्ञानसंकुल प्रकल्पाची पाहणी जिल्ह्याचे पालकसचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, अस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. रामेश्वर नाईक, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. लाड तसेच समन्वयक डॉ. आनंद लाड उपस्थित होते.

प्रकल्पाबाबत डॉ. रामेश्वर नाईक यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच उभारण्यात येणाऱ्या इमारतीची संकल्पना, प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि भविष्यातील नियोजन याविषयीही त्यांनी माहिती दिली.

## शासकीय तंत्रनिकेतनात गुरुपौर्णिमा उत्साहात

**जिंतूर, दि. २९ :** येथील शासकीय तंत्रनिकेतनात गुरुपौर्णिमेचा पावन सोहळा उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री. कानडे होते.

यावेळी प्राचार्यांच्या हस्ते संस्थेतील गुरुजन, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अधिव्याख्याते, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत गुरुंच्या ज्ञानदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गुरु हे ज्ञानाचा दीप असून जीवनाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक आहेत, असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती आर. के. देवशी यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या अर्जाची मुदत वाढविण्याची सय्यद अशफाक अली यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यांच्यासाठी घरकुल अर्ज भरण्याची मुदत किमान एक महिन्याने वाढविण्याची मागणी काँग्रेस माथाडी कामगार संघटनेचे मराठवाडा सरचिटणीस सय्यद अशफाक अली यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सदनिकांच्या अर्जाची मुदत दि. २३ जुलै २०२६ ते ६ ऑगस्ट २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, अनेक पात्र लाभार्थींना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला तसेच इतर आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध होत नसल्यामुळे अर्ज भरण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



सर्वसामान्य नागरिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या हिताचा विचार करून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अर्ज भरण्याची मुदत किमान एक महिन्याने वाढविण्यात यावी, जेणेकरून अधिकाधिक पात्र लाभार्थींना या योजनेचा लाभ घेता येईल, अशी मागणी सय्यद अशफाक अली यांनी केली आहे.

यासंदर्भातील निवेदन महानगरपालिका आयुक्तांच्या वतीने सहायक आयुक्त अनिल मुरलीधर बोंडे यांना सय्यद अशफाक अली यांनी सादर केले. महानगरपालिका प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर मुदतवाढ जाहीर करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

> **"प्रधानमंत्री आवास योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू कुटुंबांना स्वतःचे हक्काचे घर मिळवून देणारी अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. मात्र अनेक पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे ऑनलाइन अर्ज भरताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. केवळ मुदतीअभावी एकही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये, हीच आमची भूमिका आहे. शासन आणि महानगरपालिका प्रशासनाने मानवतावादी दृष्टिकोनातून अर्ज भरण्याची मुदत किमान एक महिन्याने वाढवून अधिकाधिक गरजू नागरिकांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा. सर्वसामान्यांच्या हितासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत राहू."**
>
> **-सय्यद अशफाक अली**

# लोकसंख्या स्थिरता पंधरवडा उत्साहात संपन्न; महापालिकेच्या कुटुंब कल्याण सेवांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## 26 स्त्री शस्त्रक्रिया, 80 कॉपर-टी, 25 अंतरा इंजेक्शन व 942 गर्भनिरोधक गोळ्यांचे वितरण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ११ ते २४ जुलै या कालावधीत 'लोकसंख्या स्थिरता पंधरवडा' प्रभावीपणे राबविण्यात आला. "तरुण पिढीच्या आशा आणि आकांक्षा साकारणे – आज आणि भविष्यासाठी" या वर्षीच्या संकल्पनेवर आधारित या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पंधरवड्यात विविध कुटुंब नियोजन सेवा, जनजागृती उपक्रम आणि शस्त्रक्रिया शिबिरांद्वारे मोठ्या संख्येने नागरिकांना लाभ देण्यात आला.

महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते समीर साजिद, सभागृह नेते गोविंद केंद्रे, आरोग्य सभापती डॉ. सुनीता साळुंखे, आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त (२) कल्पिता पिंपळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आरसीएच अधिकारी डॉ. मेघा जोगदंड यांच्या समन्वयाने हा पंधरवडा राबविण्यात आला.

११ जुलै रोजी नेहरूनगर आरोग्य रुग्णालयात पंधरवड्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिकारी डॉ. कल्पना राठोड-गुंजाळे यांनी कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन करत विविध तात्पुरत्या, कायमस्वरूपी आणि आधुनिक गर्भनिरोधक पद्धतींची माहिती दिली. तसेच नागरिकांसाठी मोफत उपलब्ध असलेल्या सेवांचीही माहिती देण्यात आली.

पंधरवड्यादरम्यान शहरातील महानगरपालिका रुग्णालयांमध्ये कुटुंब कल्याण साधने व पद्धतींचे प्रदर्शन करणारे विशेष माहिती कक्ष उभारण्यात आले. लेप्रोस्कोपिक सर्जन डॉ. गोविंद नरवणे, भूलतज्ज्ञ डॉ. पंडित शिरसाठ, डॉ. दौंड आणि संपूर्ण लेप्रोस्कोपी पथकाच्या सहकार्याने सिडको एन-८, सिल्क मिल कॉलनी, कैसर कॉलनी आणि नेहरूनगर येथील शिबिरांमध्ये २६ महिलांवर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. एप्रिल महिन्यापासून आतापर्यंत अशा २३२ स्त्री शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत.

या अभियानात २६ स्त्री शस्त्रक्रिया, ८० कॉपर-टी (Cu-T), १ पीपीआययूसीडी (प्रसूतीनंतर कॉपर-टी), २५ अंतरा गर्भनिरोधक इंजेक्शन तसेच ९४२ गर्भनिरोधक गोळ्यांचे वितरण करण्यात आले. लोकसंख्या स्थिरता, मातृ व बाल आरोग्य संवर्धन आणि कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

भविष्यातही अशा आरोग्यविषयक अभियानांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून उपलब्ध कुटुंब कल्याण सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# कमी वजनाच्या बालकांसाठी लासुरगावात पोषण आहार किटचे वाटप

## एच. जी. फाउंडेशन व संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचा सीएसआर उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**लासुरगाव :** एच. जी. फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत लासुरगाव येथे कमी वजनाच्या बालकांसाठी पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. बालकांचे पोषण सुधारून त्यांचे आरोग्य सक्षम करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात कमी वजनाच्या बालकांना पोषणमूल्यांनी समृद्ध अशा आहार किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये गूळ, शेंगदाणे, फुटाणे, बदाम तसेच इतर पौष्टिक अन्नघटकांचा समावेश करण्यात आला. या आहारामुळे बालकांच्या शारीरिक वाढीस चालना मिळून त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.




कार्यक्रमात संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीश लालकोट यांनी पालकांशी संवाद साधत बालकांना नियमित व संतुलित आहार देणे, वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे आणि योग्य पोषणाकडे लक्ष देणे किती महत्त्वाचे आहे, याविषयी मार्गदर्शन केले. प्रोग्राम कोऑर्डिनेटर सचिन लिमकर यांनी प्रकल्पाची माहिती देताना एच. जी. फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या माध्यमातून आरोग्य, पोषण आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याचे सांगितले.

यावेळी संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे इरशाद सय्यद, लासुरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी केतन गुंजाळ, आरोग्य सेविका सुनिता दौंड तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी उपस्थित होते. आरोग्य कर्मचाऱ्यांनी पालकांना बालकांचा योग्य आहार, स्वच्छता, नियमित वजन तपासणी आणि आरोग्यविषयक आवश्यक काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# लोखंडी सळईने भरलेल्या ट्रकला दुचाकीची धडक; 22 वर्षीय कामगार ठार, वडील व भाऊ गंभीर जखमी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरातील बकवाल नगर परिसरात रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या लोखंडी सळईने भरलेल्या ट्रकला दुचाकीची भीषण धडक बसून एका २२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

या अपघातात तरुणाचा वडील आणि लहान भाऊ गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत तरुण भगवान भानुदास रेंगे (वय २२) असे त्याचे नाव असून, मूळचे परभणी जिल्ह्यातील असलेले हे रेंगे कुटुंब सध्या शहरातील देवगिरी नगर, सिडको वाळूज महानगर येथे वास्तव्यास होते. प्राप्त माहितीनुसार, रेंगे कुटुंबातील हे सदस्य दुचाकीवरून जात असताना बकवाल नगर परिसरात रस्त्याच्या कडेला लोखंडी सळयांनी भरलेला एक ट्रक उभा करण्यात आला होता.

दरम्यान, पाऊस आणि दाट धुक्यामुळे रस्त्याच्या कडेला उभा असलेला हा ट्रक दुचाकी चालकाच्या लक्षात आला नाही, ज्यामुळे त्यांची दुचाकी थेट मागून ट्रकला धडकली.

या भीषण धडकेत दुचाकीचालक भगवान भानुदास रेंगे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे वडील भानुदास रेंगे आणि लहान भाऊ विशाल रेंगे हे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी कोणतीही सुरक्षेची खबरदारी न घेता रहदारीच्या ठिकाणी ट्रक उभा करून अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात ट्रकचालकाचा शोध पोलीस घेत असून पुढील तपास सुरू आहे.

# सामाजिक बांधिलकी जपत करिअर घडवा; जबाबदार नागरिक बना : श्रीकांत येरूळे

## एमजीएम विद्यापीठाच्या फार्मास्युटिकल सायन्सेस विभागात दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थी जीवनात करिअरला सर्वोच्च प्राधान्य देतानाच सामाजिक बांधिलकीची जाणीव कायम ठेवणे आवश्यक आहे. पदवी प्रत्येकाला मिळते, मात्र नेतृत्व, शिस्त, संवेदनशीलता आणि जबाबदार नागरिकत्व या गुणांच्या बळावरच समाजात वेगळी ओळख निर्माण करता येते, असे प्रतिपादन एमजीएम विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे यांनी केले.



महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेसमध्ये २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित दीक्षारंभ कार्यक्रमात 'रिस्पॉन्सिबिलिटी ऑफ सिटिझन ऑफ इंडिया विथ हॅपिनेस' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विभागप्रमुख डॉ. हेमंत जैन, प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येरूळे म्हणाले की, भारतीय संविधान समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारित आहे. अधिकारांइतकीच कर्तव्यांची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. वाहतुकीचे नियम पाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, राष्ट्रीय ध्वज व राष्ट्रगीताचा सन्मान करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, मतदानाचा हक्क बजावणे आणि कायद्याचा आदर करणे ही प्रत्येकाची मूलभूत जबाबदारी आहे. फार्मसी हे करिअरसाठी अत्यंत आशादायी क्षेत्र असून संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकतेच्या माध्यमातून देशाच्या विकासात मोठे योगदान देता येऊ शकते. कोविड-१९ महामारीच्या काळात भारतीय शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या कोव्हॅक्सिन आणि कोविशिल्ड लसींमुळे लाखो नागरिकांचे प्राण वाचले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ फार्मासिस्ट बनण्याचे नव्हे, तर संशोधक आणि उद्योजक होण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

येरूळे यांनी विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, टीमवर्क, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विषयक अभ्यास, तसेच लिंक्डइनसारख्या व्यावसायिक माध्यमांचा प्रभावी वापर करण्याचा सल्ला दिला.

# रोहित देशपांडे अध्यक्ष, अनुराग सावे उपाध्यक्ष; श्याम आंभोरे सचिव, डॉ. केजल भारसाखळे सहसचिव

## रग्बी असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा; जिल्ह्यात रग्बी विकासाला नवी दिशा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रग्बी खेळाचा सर्वांगीण विकास, तळागाळातील प्रतिभावान खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देणे तसेच आधुनिक रग्बी संस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने रग्बी असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर (Rugby Football Association Aurangabad, Chhatrapati Sambhaji Nagar) यांच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे.

रग्बी असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर ही रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (RAM) संलग्न अधिकृत जिल्हा संघटना असून, RAM ही भारतीय रग्बी फुटबॉल युनियन (IRFU), भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारतीय ऑलिम्पिक संघटना (IOA), एशिया रग्बी आणि वर्ल्ड रग्बी यांच्याशी संलग्न व मान्यताप्राप्त संस्था आहे. ( यासंदर्भातील अधिकृत संलग्नता पत्रक प्रसिद्धीपत्रकासोबत जोडण्यात आले आहे.)

असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक रोहित देशपांडे, उपाध्यक्षपदी उद्योगपती अनुराग सावे, सचिवपदी रग्बी कोच श्याम आंभोरे, सहसचिवपदी महिला क्रीडा संघटक डॉ. केजल भारसाखळे, तर कोषाध्यक्षपदी पूनम आंभोरे यांची निवड करण्यात आली आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून पंकज भारसाखळे, रवींद्र आंभोरे, सतीश साळवे, ऋषिकेश आंभोरे, सचिन देकळे आणि नितीन साळवे यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीने "मिशन रग्बी छत्रपती संभाजीनगर" या संकल्पनेअंतर्गत जिल्ह्यात रग्बीचा व्यापक प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. याअंतर्गत ग्रासरूट रग्बी विकास, शालेय व महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन, प्रशिक्षक व पंच प्रशिक्षण, महिला रग्बीला विशेष प्रोत्साहन, युवा प्रतिभा शोध मोहीम, राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन तसेच आधुनिक प्रशिक्षण प्रणालीचा अवलंब यावर विशेष भर दिला जाणार आहे.

"प्रत्येक शाळेत रग्बी – प्रत्येक खेळाडूला संधी" या संकल्पनेतून दर्जेदार प्रशिक्षण, स्पर्धात्मक वातावरण आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडविण्याचा संकल्प नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगरला महाराष्ट्रातील अग्रगण्य रग्बी केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षक, माजी खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी यांचे सक्रिय सहकार्य अपेक्षित असून, आगामी काळात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# अभिजीत दीपके यांनी तथ्यांऐवजी दिशाभूल करू नये; हिंसाचाराचे समर्थन अयोग्य : किशोर शितोळे

## दिल्लीतील आंदोलनातील दगडफेकप्रकरणी कायदेशीर कारवाईला विरोध का, असा सवाल

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** दिल्लीतील आंदोलनादरम्यान भाजपच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप करणारे अभिजीत दीपके यांनी तथ्यांऐवजी दिशाभूल करू नये, अशी टीका भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी केली आहे. संबंधित प्रकरणात दिल्ली पोलिस आरोपींचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करत असतील, तर त्या कारवाईला विरोध करण्याचे कारण काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

शितोळे म्हणाले की, आंदोलनादरम्यान पोलिस कर्मचारी आणि पत्रकारांवर झालेले हल्ले, दगडफेक आणि हिंसाचार हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. अशा घटनांमध्ये दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी भूमिका घेण्याऐवजी आरोपींचे समर्थन केल्याचा आभास निर्माण करणारी विधाने अभिजीत दीपके करत आहेत.

हातात संविधान घेऊन बोलणाऱ्यांनी कायद्याचा सन्मान राखत हिंसाचार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी करणे अपेक्षित होते. मात्र तसे न करता दिशाभूल करणारी भूमिका घेतली जात असल्याने त्यामागील हेतूबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होत असल्याचेही शितोळे यांनी नमूद केले.

याशिवाय, अभिजीत दीपके काँग्रेसच्या भूमिकेशी सहमत नसतील, तर कर्नाटक आणि पंजाबमधील कथित पेपर लीक प्रकरणांबाबत संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी ते कधी करणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान झालेल्या घोषणाबाजी, शिवीगाळ आणि त्यानंतर झालेल्या कथित जल्लोषाबाबतही अभिजीत दीपके यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी केली.

# सभापती अनिल मकरीये यांनी घेतला विकासकामांच्या एनओसीचा आढावा; प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांच्या विकासकामांना गती मिळावी आणि मंजूर कामांचा तातडीने मार्ग मोकळा व्हावा, या उद्देशाने स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महानगरपालिका हद्दीतील विविध विकासकामांसाठी देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्रांचा (एनओसी) सविस्तर आढावा घेतला.

बैठकीत खासदार निधी, आमदार निधी, जिल्हा नियोजन समिती तसेच शासनाच्या विविध योजनांअंतर्गत मंजूर झालेल्या रस्ते, ड्रेनेज, नाले संरक्षण भिंती, उद्याने आणि अन्य विकासकामांची सविस्तर माहिती घेण्यात आली. पूर्ण झालेली, प्रलंबित तसेच तांत्रिक कारणांमुळे रखडलेली कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

यावेळी मंजूर विकासकामांच्या अंमलबजावणीत कोणताही अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांना दर्जेदार आणि मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विभागांमध्ये आवश्यक समन्वय राखून सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सभापती अनिल मकरीये यांनी सांगितले.

# पंतप्रधान आवास योजनेतील हर्सूल सदनिकांच्या निकृष्ट कामाची चौकशी करा

## नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल यांची मागणी; आयुक्त अमोल येडगे यांचे तातडीच्या कारवाईचे आश्वासन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने हर्सूल येथे सुरू असलेल्या पंतप्रधान आवास योजनेतील सदनिकांच्या बांधकामात गंभीर दर्जाहीनता झाल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी शिवसेना नगरसेवक ऋषिकेश सरोज प्रदीप जैस्वाल यांनी मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्याकडे केली आहे. थर्ड पार्टी गुणवत्ता तपासणी संस्थेच्या (TPQMA) अहवालात कामाचा दर्जा अत्यंत सुमार असून इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

जैस्वाल यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २१ मे २०२६ रोजीच्या टीपीक्यूएमए अहवालात कामाबाबत अत्यंत गंभीर निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत. "The Quality Work is Extremely Poor & the Structural Stability is at Serious Risk" असा स्पष्ट अभिप्राय देण्यात आला असून, संबंधित कंत्राटदाराला काम तात्काळ थांबविण्याचे निर्देशही देण्यात आले होते. तसेच स्टील रॉडचे लॅपिंग धोकादायक भागात करण्यात आल्याने इमारतीच्या मजबुतीवर परिणाम होऊ शकतो, असेही अहवालात नमूद असल्याचा दावा त्यांनी केला.

निविदेतील अटींनुसार भूमिगत पाण्याच्या टाकीसाठी एम-३० दर्जाचे काँक्रीट व वॉटरप्रूफ उपचार आवश्यक असताना प्रत्यक्षात विटांचे बांधकाम करण्यात आल्याचा आरोपही जैस्वाल यांनी केला. याशिवाय कामगारांच्या सुरक्षेबाबतही गंभीर त्रुटी असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. तसेच ईपीएफ, ईएसआयसी आणि व्यावसायिक कराबाबतही नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप त्यांनी केला.

प्रकल्पावरील संबंधित अधिकारी कंत्राटदाराला लाभ मिळेल अशा पद्धतीने कामकाज करत असून निविदेतील अटींकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत त्यांची बदली करून सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणीही त्यांनी केली. या सदनिकांमध्ये शहरातील गरीब व निराधार कुटुंबे वास्तव्यास येणार असल्याने निकृष्ट दर्जाच्या कामामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

थर्ड पार्टी अहवालाच्या आधारे सदर काम तातडीने थांबवून स्वतंत्र संस्थेमार्फत गुणवत्ता तपासणी करावी आणि निविदेतील सर्व अटींचे पालन झाल्याशिवाय कंत्राटदाराची कोणतीही देयके अदा करू नयेत, अशी मागणी जैस्वाल यांनी केली.

दरम्यान, मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेत संबंधित प्रकरणात तातडीने आवश्यक कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911